# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- *jtdirrom@gmail.com* *website – www.jdteromumbai.com*


परिपत्रक — क्र. ४/विकामुं/तंशि/ईबीसी/२०१५/2790

**कालमर्यादा दि. ३०/१०/२०१५** — दिनांक : 06 OCT 2015

प्रति,
सर्व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
एमबीए, एमसीए, अभियांत्रिकी पदवी/पदविका,
औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालये.

विषय : खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत शिक्षण संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबत. . . . . . . . . . . . .
(शैक्षणिक वर्ष २०१५-१६)

संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक १. क्र. ४/विकामुं/तंशि/ईबीसी/२०१५/२६६१, दि. १५/९/२०१५
२. क्र. ४/विकामुं/तंशि/ईबीसी/२०१५/२६८८, दि. २३/९/२०१५
३. दि. ३०/९/२१५ रोजीचा ईबीसी ओरिएंटेशन प्रोग्राम शै.व. २०१५-१६

सर्व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित एमबीए, एमसीए, अभियांत्रिकी पदवी/पदविका, औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालयांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेशित आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबतचे ऑनलाईन अर्ज तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावरील EBC Concession या लिंकवर भरुन घेण्याकरिताची तरतूद होईपर्यंत पुढील आदेशापर्यंत ईबीसी प्रतिपूर्ती योजनेकरिता पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांकडून सोबत जोडलेल्या ऑफलाईन अर्जाच्या नमुन्याप्रमाणे अर्ज भरुन घ्यावेत. सदर अर्ज भरुन घेण्याचा कालावधी दि. ३०/१०/२०१५ पर्यंत ठेवण्यांत यावा.

ऑफलाईन अर्जासोबत खालील कागदपत्रे असणे अनिवार्य आहे.

१. ऑफलाईन अर्ज
**(अर्जाच्या शेवटी विद्यार्थी व विद्यार्थ्याच्या पालकाची स्वाक्षरी व त्याखाली प्राचार्य/संचालकांची स्वाक्षरी अनिवार्य आहे.)**
२. मूळ उत्पन्नाचा दाखला
३. डोमिसाईल सर्टिफिकेट किंवा लिव्हींग सर्टीफिकेट (दोन्ही सर्टिफिकेट्स उपलब्ध नसतील तरच जन्म दाखला)
४. मागिल वर्षाच्या गुणपत्रिका (विद्यार्थ्याच्या गुणपत्रिकेवर FAIL असे नमूद केलेले असल्यास पुढील वर्षात प्रवेशासाठी पात्र असल्याबाबतचे प्राचार्यांचे साक्षांकन [Attestation] असणे अनिवार्य आहे.)
५. रेशनकार्डची छायांकीत प्रत
६. गॅप असल्यास मूळ प्रतिज्ञापत्राची नोटरी असलेली प्रत (Original affidavit should be submit)
७. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ ची शुल्क जमा पावती
८. वडील हयात नसल्यास मृत्यू दाखला (आईच्या नावे उत्पन्नाचा दाखला असल्यास)
९. आधार कार्डाची छायांकीत प्रत
१०. पासबुकची छायांकीत प्रत (पासबुक केवळ विद्यार्थ्यांच्या नावे असावे. संयुक्त खाते असलेल्या पासबुकची प्रत नसावी.)
११. ५० टक्के शिक्षण शुल्कापेक्षा उत्पन्न कमी असल्यास ज्यांच्याकडून अर्थसहाय्य घेतले त्यांचे मूळ प्रतिज्ञापत्र / शैक्षणिक कर्ज घेतले असल्यास बँकेचे प्रमाणपत्र
१२. स्वयं सांक्षाकन घोषणापत्र (विद्यार्थ्याने स्वयं सांक्षाकन केले असल्यास)
१३. केंद्रिभूत प्रवेश घेतलेल्या अलॉटमेंट लेटरची प्रत

...२.

महत्त्वाची टिप्पणी :

अर्जासोबत जोडावयाच्या सर्व छायांकीत प्रती साक्षांकीत केलेल्या असाव्यात. विद्यार्थ्याने स्वयं सांक्षाकन केलेले असल्यास प्रचलित नियमानुसार विद्यार्थ्याने विहीत प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे.

(साक्षांकीत प्रती नसलेले व वरीलप्रमाणे विहीत कागदपत्र न जोडलेले अर्ज कोणतीही पूर्वसूचना न देता रिजेक्ट केले जातील.)

Important Note :

All Xerox copies with EBC form should be attested. If student submit the self attested documents then valid certificate should be submitted by student.

(Without attested copies & without valid document forms will be reject any prior intimation.)

**ईबीसी प्रस्ताव सादर करतांना आवश्यक असलेले "प्रमाणपत्र व हमीपत्र" तसेच विद्यार्थ्यांकडून आवश्यक असलेले "स्वयं घोषणापत्र" तसेच शिक्षण शुल्क तक्ता सादर करणे अनिवार्य आहे.** (सोबत सदर प्रमाणपत्रे व शिक्षण शुल्क तक्त्याच्या प्रती जोडलेल्या आहेत)

(प्रमाणपत्र व हमीपत्र, विद्यार्थ्याचे स्वयं घोषणापत्र तसेच शिक्षण शुल्क तक्त्याशिवाय सादर होणारे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.)

सर्व संस्थांना सूचित करण्यांत येते की, त्यांनी वरील कागदपत्रे संस्था स्तरावर समिती गठीत करुन सुव्यवस्थितपणे त्याची छाननी करावी. जेणेकरुन एकाही विद्यार्थ्यांचा अर्ज नामंजूर होणार नाही. याबाबतच्या आवश्यक सूचना संदर्भीय परिपत्रक १ व २ मध्ये दिलेल्या आहेत. तसेच दि. ३०/०९/२०१५च्या "EBC Orientation Programme-2015" मध्ये देण्यांत आलेल्या आहेत. ऑनलाईन अर्ज भरुन घेण्याची तरतूद होईपर्यंत सर्व अर्जाकरिता ऑफलाईन विवरणपत्र संस्थांना सादर करावयाचे आहे. त्याचा Excel Sheet मधील नमुना (File) सोबत जोडलेला आहे. त्यानुसार प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, थेट द्वितीय वर्ष, तृतिय वर्ष व अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांकरिता एकाच एक्सलशिट मध्ये स्वतंत्र विवरणपत्रे तयार करावीत. सदर विवरणपत्रान्वये वर्षनिहाय सर्व अर्ज एका खाली एक अशा क्रमाने जोडणे आवश्यक आहे.

मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांनी दि. ३०/१०/२०१५ पर्यंत सदर अर्ज घेण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार संस्थांनी विद्यार्थ्यांचे अर्ज दि. ३०/१०/२०१५ पर्यंत घेणे अनिवार्य आहे. असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याच संस्था त्यांच्या सोयीने विभागीय कार्यालयाने कळविलेल्या अंतिम तारखेच्या अगोदरची तारीख विद्यार्थ्यांना नमूद करुन अर्ज भरण्यास सांगतात व संस्थेने जाहिर केलेली अंतिम तारिख संपल्यानंतर विद्यार्थ्यांचे अर्ज स्विकारण्यास नकार देतात. परिणामी असे विद्यार्थी ह्या कार्यालयाकडे त्यांचा अर्ज स्विकारण्याबाबत विनंती करण्यासाठी येतात. त्यामुळे सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, त्यांनी विद्यार्थ्यांचे अर्ज दि. ३०/१०/२०१५ पर्यंत स्विकारावेत.

ऑनलाईन अर्जाबाबतची सूचना मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध होताच त्यांनी दिलेल्या सूचनांनुसार पुढील कार्यवाही करण्याबाबत संस्थांना कळविले जाईल. तसेच स्विकारलेले अर्ज संस्थानिहाय या कार्यालयाकडे सादर करण्याची अनुसूचीही माहे नोव्हेंबर-२०१५ च्या पहिल्या आठवड्यात परिपत्रकाद्वारे सर्व संबंधित संस्थांना कळविण्यांत येईल.

**शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून शिक्षण शुल्क समितीच्या नियमानुसार थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शुल्क व प्रथम वर्ष उत्तीर्ण होऊन द्वितीय वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क समान असणे अनिवार्य आहे. बऱ्याच संस्था ह्या नियमाचे पालन करताना दिसत नाहीत. त्याकरिता संस्थांना सूचित करण्यांत येते की, प्रथम वर्षातून उत्तीर्ण होऊन द्वितीय वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांशी थेट द्वितीय वर्ष विद्यार्थ्यांचे शुल्क समान असणे आवश्यक आहे.**

प्रचलित पध्दतीनुसार संस्थांनी ईबीसी अर्जाचे प्रस्ताव सादर केल्यानंतर विभागीय कार्यालयाच्या स्तरावर अर्जाची छाननी होते. छाननी पश्चात् त्रुटी असलेल्या अर्जाबाबत संस्थेला त्यांची यादी स्कॅन करुन ईबीसी लिंकच्या मेसेज बॉक्सद्वारे कळविण्यांत येते. परंतु ऑनलाईन पध्दत सुरु होऊन २ वर्ष लोटल्यानंतरही ४० ते ५० टक्के संस्थांनी त्रुटी पूर्ततेबाबत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाला प्रतिसाद न दिल्यामुळे शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून विभागीय स्तरावर होणा-या ईबीसी अर्जाच्या छाननीनंतर संस्थांना त्रुटीपूर्ततेकरिता यादी पाठविण्यांत येणार नाही. याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.

संस्था स्तरावर सर्व अर्जांची काळजीपूर्वक छाननी करुनच सर्व अर्ज परिपूर्णपणे कोणतीही त्रुटी न ठेवता दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसारच सादर करावेत. अपूर्ण अर्ज, विहीत कागदपत्रांची पूर्तता न करता सादर केलेले अर्ज, संस्थास्तरावर जोडावयाची विहीत प्रमाणपत्रे, शिक्षण शुल्क तक्ता, विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी इ. बाबींपैकी कोणत्याही एका बाबीची पूर्तता केलेली नसेल तर असे अर्ज नामंजूर करण्यांत येतील. त्रुटी पूर्ततेकरिता यापुढे संस्थांशी कोणत्याही प्रकारे दूरध्वनीवर तथा पत्राद्वारे संपर्क साधला जाणार नाही. करिता सर्व संस्थांना सूचित करण्यांत येते की, आपला प्रस्ताव संपूर्ण कागदपत्रांसह परिपूर्ण राहील. याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.

असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याच संस्थांमधील ईबीसी कामकाज हाताळणारे कर्मचारी बदललेले आहेत. तसेच काही संस्थांचे ईमेल आयडीही बदलले आहेत. तरी या परिपत्रकाद्वारे सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, त्यांनी त्यांच्या संस्थेची माहिती पुढील तक्त्यात भरुन दि. २०/१०/२०१५ पर्यंत या कार्यालयास एक्सेलशीट मध्ये नमूद करुन त्याची सॉफ्ट कॉपी jtdirrom@gmail.com या मेल आयडीवर विनाविलंब पाठवावी. जेणेकरुन ह्या कार्यालयामार्फत वेळोवेळी पाठविण्यांत येणारी परिपत्रके तसेच इतर माहिती सर्व संस्थांना पाठविणे सोयीचे होईल. तसेच खालील माहितीची एक प्रत ईबीसी प्रस्तावाच्या फाईलसोबत जोडावी.

DTE CODE –
Name of Institute –

| Sr. No. | Name of Concern Staff | Designation | Mobile No. | E_mail ID of Institute & concern staff |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

**Directorate of Technical Education, Maharashtra State, Mumbai**
**3, Mahapalika Marg, Mumbai-400 001.**

| Candidate Recent Passport size Photo |
|---|

## Application Form to be filled by Candidate for EBC Scholarship in Academic Year 2015-16

**(Those who are eligible for this scheme)**

### Candidate Information

| **A. Personal Details** | | | |
|---|---|---|---|
| **Application ID No.** | | | |
| Candidate full name in Capital Letters (As per SSC Certificate) | | | |
| Gender | | DOB (DD/MM/YYYY) | |
| Candidature Type | | Place of Birth (With District) | |
| Category | | Mother Tongue | |
| Religion | | Region | |
| Permanent Address | | | |
| Mobile No | | E-Mail ID | |
| **B. Admission Details** | | | |
| Institute Name | | | |
| Course Name | | | |
| Choice Code | | Seat Type | |
| Admission Date | | Reporting Date | |
| CAP Round | | CAP Merit No | |
| Admitted Through | CAP/Against Cap/ Institute Level | Fees Paid | |

## C. Other Details

| | | | |
|---|---|---|---|
| Have You Applied for EBC Scholarship Last Year | | Yes/No | |
| Current Studying Year | | Application ID No. | |
| Name of School/Institute Last Attended | | | |
| Address of School/Institute Last Attended | | | |
| Last Year Result Status | | Passed/ATKT | |
| Applied for any other Scholarship/Concessions | | | |
| Whether any brother/sister has availed benefits of this scheme | | Yes/No | |
| If answer "Yes" in above row how many brother/sister has taken this facility. | | | |
| Child Number | * (अपत्त्य क्रमांक) | UID Number (Adhar Card No.) | |
| Last year result status | | Name as per Adhar Card | |
| Guardian's Name Father/Mother | | Guardian's Native Place | |
| Candidate's Birth Place | | Telephone No | |
| S.S.C. Roll No | | | |

## D. Family Income Details

| | |
|---|---|
| Total Income from Salary (Including All Allowances) / Land / Farming / Immovable Property / Any Other Income of All Family Members | |
| Income Certificate Issuing Authority | Collector/SDO/Tahasildar |
| Income Certificate Number | |
| Income Certificate Issue Date | |
| Income Certificate Financial Year | |

## E. Candidate's Bank Details (Core Banking facility should available)

| | | | |
|---|---|---|---|
| Candidate's Name (As Per Bank Record) | | | |
| Account No. | | | |
| Bank Name | | Branch Name | |
| IFSC Code | | MICR Code | |
| Bank Address | | Whether account seeded with Adhar card | Yes/No |

**I am attaching the attested copies of following require documents as per the sequence given herewith. (Candidate is produced to show original documents for verification at ARC)**

| Sr.No. | Documents Details | Cross which is not applicable |
|---|---|---|
| 1 | Cap Admission allotment Letter | Yes/No |
| 2 | Original Income Certificate (F.Y. 2014-15) | Yes/No |
| 3 | Domicile Certificate/Leaving Certificate | Yes/No |
| 4 | Mark sheets of Last Year | Yes/No |
| 5 | Certificate of Number of members in the family (attached ration Card copy) | Yes/No |
| 6 | Original Gap Affidavit (If applicable) | Yes/No |
| 7 | Fee Receipt of A.Y. 2015-16 | Yes/No |
| 8 | Adhar Card | Yes/No |
| 9 | Father Death Certificate (If attached Mother Income Certificate) | Yes/No |
| 10 | Pass Book (Jt. Account not applicable) | Yes/No |
| 11 | Self attested Declaration (If document attested by student) | Yes/No |
| 12 | Declaration (Not taken other Scholarship) | Yes/No |

**Declaration**

The above information given by me for EBC concession as a parent is true to the best of my knowledge & belief. If at later stage, it is found that I have furnished wrong information and/or submitted false certificates, I am aware that my sons/daughters admission stands cancelled. Pay two fold of amount sanctioned by the Authority. The authority may recover the amount from me, from my heritor or as dues on land revenue in case of not returning the amount.

Father/Mother/Guardians Signature

Student Signature

**Verified all details of the candidate as above**

Principal Signature with Seal

**ईबीसी पात्र विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्जांचे प्रस्ताव सादर करताना**

**संस्थेने लेटरहेडवर सादर करावयाचे प्रमाणपत्र व हमीपत्र**

**(प्रमाणपत्र व हमीपत्र एकाच लेटरहेडवर सादर करावे.)**

# <u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०....-.... करिता या संस्थेतील एकूण ........ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरलेले आहेत. त्यापैकी संस्थास्तरावर एकूण ....... अर्जांची छाननी, संस्थांतर्गत छाननी समितीमार्फत करण्यांत आली असून ....... एवढ्या विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यांत आले आहेत.

| | | |
|---|---|---|
| अर्ज प्रत्यक्ष<br>स्विकारणायाची स्वाक्षरी | तपासणी<br>अधिकायाची स्वाक्षरी | अर्ज प्रमाणित<br>अधिकायाची स्वाक्षरी |

# <u>हमीपत्र</u>

या संस्थेमार्फत शैक्षणिक वर्ष २०....-.... करिता एकूण ....... अर्ज सादर करण्यांत येत असून सर्व अर्जांची छाननी सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संस्थेमध्ये ईबीसी अर्ज छाननीकरिता गठीत केलेल्या समितीमार्फत करण्यांत आली असून प्रत्येक अर्जासोबत आवश्यक असलेली कागदपत्रे अचूक व योग्य जोडलेली आहेत. सोबतच्या अर्जांमध्ये त्रुटी आढळल्यास व अर्ज नामंजूर झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.

संस्थाप्रमुखाची स्वाक्षरी व शिक्का

## विद्यार्थ्यांकडून घ्यावयाचे स्वयं घोषणापत्र

# स्वयं घोषणापत्र

मी, ---------------------------------------------------------------------------- श्री. ---------------------------------------------------------------------- यांचा मुलगा/मुलगी, वय ......... वर्षे, राहणार ---------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

असे घोषित करतो की, शैक्षणिक वर्ष २०..... -...... मध्ये ---------------------------------------------------------------------------------------------------- ह्या महाविद्यालयात केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिये मार्फत ---------------------------------------------------------------------------------- ह्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असून सदर शैक्षणिक वर्षात मी शासनाच्या कोणत्याही योजनेतून शैक्षणिक शुल्काचा लाभ घेतलेला नाही. मला इतर योजनेतून लाभ मंजूर झाल्यास या योजनेद्वारे प्राप्त झालेली रक्कम शासनाकडे जमा करीन.

विद्यार्थ्याचे नाव व स्वाक्षरी

# शिक्षण शुल्क तक्ता

| शैक्षणिक वर्ष | शिक्षण शुल्क समितीकडून मंजूर झालेले शिक्षण शुल्क | वर्षनिहाय वाढीव शुल्क | एकूण शुल्क |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २००८-०९ | | ---- | कॉलम २ प्रमाणे |
| २००९-१० | | कॉलम २च्या ७ % | कॉलम २ + ३ |
| २०१०-११ | | कॉलम २च्या ७ % | कॉलम २ + ३ |
| २०११-१२ | | कॉलम २च्या ७ % | कॉलम २ + ३ |
| २०१२-१३ | | कॉलम २च्या ८ % | कॉलम २ + ३ |
| २०१३-१४ | | कॉलम २च्या ८ % | कॉलम २ + ३ |
| २०१४-१५ | | कॉलम २च्या ८ % | कॉलम २ + ३ |
| २०१५-१६ | | ---- | कॉलम २ प्रमाणे |

## उदाहरणार्थ

| शैक्षणिक वर्ष | शिक्षण शुल्क समितीकडून मंजूर झालेले शिक्षण शुल्क | वर्षनिहाय वाढीव शुल्क | एकूण शुल्क |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २००८-०९ | ४५००० | ---- | ४५००० |
| २००९-१० | ५०००० | ३५०० | ५३५०० |
| २०१०-११ | ६०००० | ४२०० | ६४२०० |
| २०११-१२ | ६५००० | ४५५० | ६९५५० |
| २०१२-१३ | ७०००० | ५६०० | ७५६०० |
| २०१३-१४ | ७५००० | ६००० | ८१००० |
| २०१४-१५ | ८०००० | ६४०० | ८६४०० |
| २०१५-१६ | ९०००० | ---- | ९०००० |

## थेट द्वितीय वर्ष विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क ऑनलाईन भरताना खालील सूचनेचे पालन करावे.

शिक्षण शुल्क समितीच्या नियमानुसार थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेणाया विद्यार्थ्याचे शुल्क व प्रथम वर्ष उत्तीर्ण होऊन द्वितीय वर्षात प्रवेशित विद्यार्थ्याचे शिक्षण शुल्क समान असणे अनिवार्य आहे. बऱ्याच संस्था ह्या नियमाचे पालन करताना दिसत नाहीत. त्याकरिता संस्थांना सूचित करण्यांत येते की, सर्व शैक्षणिक वर्षातील थेट द्वितीय वर्ष प्रवेशित विद्यार्थ्याचे शुल्क त्या आधीच्या शैक्षणिक वर्षातील प्रथम वर्ष उत्तीर्ण होऊन द्वितीय वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काशी समान असावे व त्यानुसार ईबीसीच्या ऑफलाईन विवरणपत्रामध्ये/ऑनलाईन लिंकवर नमूद करणे आवश्यक आहे.

**जे विद्यार्थी त्यांची कागदपत्रे स्वयं साक्षांकीत करतील त्यांच्याकडून खालीलप्रमाणे स्वयंघोषणापत्र जोडणे अनिवार्य आहे.**

## प्रपत्र - ब

### स्वयं साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र

अर्जदाराचा फोटो

मी -------------------------------------------------- श्री. -------------------------------------------------- यांचा मुलगा / मुलगी वय ........ वर्ष, आधार क्रमांक (असल्यास)............................... व्यवसाय ------------------------ राहणार ----------------------------------------------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------------------

याद्वारे घोषित करतो / करते की, मी स्वयं साक्षांकीत केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्याच सत्य प्रती आहेत. त्या खोट्या असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता आणि किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहील याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण : ------------------------

अर्जदाराची सही

अर्जदाराचे नाव ------------------------------------------

दिनांक .....................

**DTE CODE :**

**Name of Institute :**

**1st Year/2nd Year/DSE/3td Year/FE**

| Sr.No. | Curretnt Sudying Year | Course Name | Application ID | Adhaar Number | Candidate Name | Admission Year | Bank Account No. | Bank Name | Branch Name | IFSC Code | MICR Code | Tution Fee | 50% of Tution Fee |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |